सत्यमेव जयते

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

आपले सरकार सेवा केंद्र जाहिरात-२०२६

ठाणे जिल्हयात ग्रामीण भागात रिक्त असलेल्या एकूण ३८१ आपले सरकार सेवा केंद्रासाठी जाहिरात प्रसिध्द करणेत येत असून सदर केंद्रासाठी दि. २०/०८/२०२६ ते २०/०९/२०२६ या कालावधीत अर्ज मागविणेत येत आहे. १) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि. विभाग शासन निर्णा क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९ जानेवारी २०१८,२)सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक आसेके-१७२५/प्र.क्र.८६/मातं ३९) दि. २७ मार्च २०२५ ३) सामान्य प्रशासन विभाग,शुध्दीपत्रक क्रमांक-०४८/प्र.क्र.१/२०२५, ०२ जून २०२५ व ४) शासन शुद्धीपत्रक क्रंमाक आसेके-२०२६/प्र.क्र.९८/TECH-१(E-१७४२६६६) दिनांक ०९ जुलै २०२६ दिलेल्या निदेश व मार्गदर्शक तत्वानुसार) अर्जदार यांनी खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन अर्ज सादर करावेत.

नवीन आपले सरकार सेवा केंद्राकरीता अटी व शर्ती

१. **https://forms.gle/ti2jwA9TeAhLCKZ56** या ऑनलाइन लिंक वर दिलेली सर्व माहिती अर्जदार यांनी मराठी भाषेमध्ये अचूक भरुन सबमिट करावी. तद्नंतर अर्जदार यांनी नमूद केलेल्या माहितीचा फॉर्म अर्जदार यांचे **रजिस्टर ई-मेलवर प्राप्त होईल त्यांची प्रिंट काढून सर्व आवश्यक कागदपत्रे (स्वत: साक्षांकित केलेली)जोडून आपल्या तालुक्याच्या कार्यक्षेत्राच्या निवासी नायब तहसिलदार यांचेकडे दि.२२/०९/२०२६ पूर्वी कार्यालयीन वेळेत (स.९.४५ वा.ते सा.६.१५वा.) जमा करावा.**
२. किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे.
३. किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण असावा.
४. संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक राहील. MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्रास प्राधान्य देण्यात येईल.
५. संबंधित ग्रामपंचायत क्षेत्राचा स्थानिक रहिवासी असावा.
६. आधार क्रमांक, पॅन, बॅक खाते व आवश्यक ओळखपत्र उपलब्ध असावे.
७. नैतिक अध:पतन, आर्थिक फसवणूक किंवा सायबर गुन्ह्याबाबत दोषी ठरलेला नसावा.
८. महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या आपले सरकार सेवा केंद्राबाबतचे १. शासन निर्णय क्र. मातंस-१७१६ /प्र. क्र.५१७/३९ दिनांक १९ जानेवारी २०१८. २. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-आसेके-१७२५ /प्र.क्र. ८६/माते (३९) सामान्य प्रशासन विभाग दिनांक २७ मार्च २०२५. ३.शासन शुद्धीपत्रक क्रमाक मातंस ०४८/प्र.क्र.१/२०२५ दिनांक ०९ जुलै २०२६ च्या शासन निर्णयाला अधिन राहुन आपले सरकार केंद्राचे वाटप व केंद्र कार्यान्वित केल्या जाईल. तसेच वरीलप्रमाणे शासन निर्णय व शासन शुद्धीपत्रकामधील अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारास अनिवार्य राहील.
९. अर्जदार हा त्या भौगोलिक क्षेत्रातील रहिवासी असावा.ग्रामपंचायत क्षेत्राकरीता संपूर्ण ग्रामपंचायत क्षेत्र भौगोलिक घटक म्हणून ग्राहय धरण्यात येईल.
१०. अर्जदारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.
११. शासन निर्णय दि.१९ जानेवारी २०१८, दि. २७ मार्च २०२५ व शासन शुद्धीपत्रक ०९ जुलै २०२६ नुसार आपले सरकार सेवा केंद्राचे बॅनर (परिशिष्ट ड), तसेच केंद्रामार्फत देण्यात येणा-या सेवा (परिशिष्ट क) दर्शनी भागावर प्रसिध्द करणे, तसेच शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रानुसार केंद्र चालु ठेवणे, शासनाने ठरवुन दिलेले दरपत्रक केंद्रावर प्रसिध्द करणे, तसेच ठरवुन दिलेल्या दरापेक्षा अधिक शुल्काची आकारणी न करणे.
१२. शासनाने पुरविलेल्या आज्ञावली इ. चे योग्य वापर, संरक्षण व जतन करणे, आवेदकांना बंधनकारक राहील.

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे – ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ – २५३४ ४७०५ / २५३४ ४७०९ ■ ई–मेल : collectorofficethane@gmail.com ■ Website : www.thane.nic.in

१३. आपले सरकार सेवा केंद्र हे केंद्राच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अधिसुचित ठिकाणीच चालवणे क्रम प्राप्त आहे. केंद्राचे ठिकाण बदलण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास, गंभीर स्वरुपाची चुक समजुन केंद्र रदद करण्यात येईल.

१४. अर्जदार फक्त एकच आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करु शकतो.

१५. तसेच यापुर्वी ज्यांचेकडे स्वत: किंवा कुटुंबात आधी पासुन आपले सरकार सेवा केंद्र सुरु असेल त्याचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही. कुटुंबातील एकच व्यक्ती आपले सरकार सेवा केंद्र मिळण्यास पात्र राहील. (कुटुंब म्हणजे पती, पत्नी व अविवाहीत मुले/मुली)

१६. आपले सरकार सेवा केंद्र मिळण्यासाठी रहिवासाबाबत दिलेली माहिती किंवा इतर आवश्यक माहिती अर्जामध्ये जर चुकीची आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येवुन अपात्र ठरविण्यात येईल. व निवड झाल्यानंतर सुध्दा निवड प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर निवड रदद करण्यात येईल.

१७. अर्जदार हा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. अर्जदाराचे पोलीस चारित्र पडताळणी प्रमाणपत्र. (अंतिम पात्र यादी प्रसिद्ध झाल्यानंतर 1 महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक राहील.)

१८. आपले सरकार सेवा केंद्राना शासनाने तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाने तसेच उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे/निर्देशांचे पालन करावे लागेल. तसेच त्यांनी केंद्राबाबत मागीतलेले अहवाल तात्काळ सादर करावे लागतील.

१९. शासन निर्णयानुसार ठरवुन दिलेल्या सर्व सेवा आपले सरकार सेवा केंद्रातुन विहित शुल्कात देणे अनिवार्य राहील.

२०. शासनाचे साहित्य प्राप्त झाल्यास त्याचे काटकसरीने वापर करुन संरक्षण व जतन करावे लागेल, तसेच डिजिटल पेमेंटला प्राधान्य दयावे लागेल.

२१. जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांनी नियुक्ती केलेले अधिकारी हे आपले सरकार सेवा केंद्राची संपूर्ण चौकशी /तपासणी करु शकतील. यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचना/निर्देश/आदेश यांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

२२. आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी त्या-त्या भौगोलिक क्षेत्रात एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास शासन शुद्धीपत्रक दि.०९ जुलै २०२६ नुसार गुणांकन प्रक्रिया राबविण्यात येईल. तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा सेतु समितीचा निर्णय अंतिम राहील.

२३. केंद्र व राज्य शासनाचे / निमशासकीय/ सार्वजनिक उपक्रमे/महामंडळे/ स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच तसेच शासकीय सेवांमध्ये कार्यरत असणा-या अधिकारी/कर्मचारी यांना आपले सरकार सेवा केंद्राकरिता अर्ज करता येणार नाही.

२४. आपले सरकार सेवा केंद्र वाटपाबाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतु समिती, ठाणे यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील, याबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

२५. जाहिरात प्रसिध्द करणे, स्थगीत करणे, जाहिरातीमध्ये दुरुस्ती, संपूर्ण प्रक्रिया रदद करणे, किंवा नव्याने जाहिरात प्रसिध्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतु समिती यांना राहील.

२६. काही अपिरहार्य कारणास्तव (तक्रारी अथवा अनियमितता आढळल्यास) तालुक्यातील एखाद्या किंवा काही केंद्राचा निर्णय राखील ठेवुन चौकशी अंती अंतीम निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हा सेतु समिती कडे राहतील.

1) **पायाभूत सुविधा :-**

प्रत्येक सेवा केंद्रामध्ये किमान खालील सुविधा असणे आवश्यक राहील.

- किमान १०० चौ. फुट कार्यालयीन जागा
- दोन संगणक/लॅपटॉप
- लेझर प्रिंटर
- स्कॅनर
- बायोमेट्रिक उपकरण
- वेबकॅम
- युपीएस अथवा पर्यायी वीज बॅकअप
- ब्रॉडबैंड इंटरनेट (ग्रामीण १० mbps नागरी २० mbps)
- सीसीटीव्ही व्यवस्था
- नागरिकांसाठी प्रतीक्षाकक्ष
- शासनप्राधिकृत सेवा शुल्क दर्शविणारा फलक व बाह्य नामफलक

2) **मुलाखत :- जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत अर्जदारांची संरचित मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीमध्ये खालील बाबींचे मूल्यांकन करण्यात येईल.**

- शासकीय सेवांचे ज्ञान
- नागरिकाभिमुख सेवावृत्ती
- डिजिटल प्रणाली हाताळण्याची क्षमता
- समस्या सोडवण्याची क्षमता
- संवाद कौशल्य
- प्रामाणिकपणा व नैतिकता
- माहिती गोपनीयता व डेटा सुरक्षा याबाबत जागरूकता

३) **कार्यप्रदर्शनावर आधारित करार नुतनीकरण :-**

निवड झालेल्या VLE ला प्रारंभी वर्षाचा करार देण्यात यावा. पुढील नुतनीकरण खालील कार्यप्रदर्शन निर्देशकांच्या आधारे करण्यात येईल.

- केलेल्या व्यवहारांची संख्या
- नागरिक समाधान निर्देशांक
- सेवा देण्यास लागणारा सरासरी कालावधी
- प्राप्त तक्रारींची संख्या व त्यांचे निराकरण
- लेखापरिक्षणातील अनुपालन
- प्रणालीची कार्यक्षमता (System uptime)
- आर्थिक शिस्त
- शासनाच्या विविध मोहिमांमध्ये सहभाग

4) **अपात्रता निकष :-**

खालील परिस्थितीत अर्जदारास अपात्र ठरवण्यात यावे.

- खोटी किंवा बनावट कागदपत्रे सादर करणे.
- कोणत्याही शासकीय योजनेतून काळ्या यादीत समाविष्ट असणे.
- आर्थिक फसवणूक अथवा सायबर गुन्ह्यांची प्रलंबित गंभीर प्रकरणे असणे.

5) **निवड प्रक्रिया :-**

१. अर्जाची प्राथमिक छाननी व पडताळणी.
२. गुणांकनाच्या आधारे कागदपत्रांचे परीक्षण,
३. प्रस्तावित कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी.
४. पोलीस पडताळणी.
५. जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत संरचित मुलाखत.
६. १०० गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (Merit List) तयार करणे.
७. प्राथमिक निवड यादी प्रसिद्ध करून हरकती मागविणे.
८. अंतिम निवड व नियुक्ती आदेश देणे.
९. अनिवार्य प्रशिक्षण व ६ महिन्यांचा परिविक्षाधिन कालावधी
१०. समाधानकारक कार्यप्रदर्शनानंतर नियमित मान्यता.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग शासन शुद्धीपत्रक क्रंमाक आसेकें-२०२६/प्र.क्र.९८/TECH-१(E-१७४२६६६) दिनांक ०९ जुलै २०२६ अन्वये गुणांकनावर आधारित निवड निकष (एकूण १०० गुण)

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत सेतू प्रभारी अधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे संयुक्तरीत्या अर्जाची छाननी पार पाडतील. तसेच दि.२३/०८/२००२ च्या शासन निर्णयान्वये स्थापित केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सेतू समिती समोर सदर प्रस्ताव ठेवून आपले सरकार सेवा केंद्र देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी त्या-त्या भौगोलिक क्षेत्रात **एकापेक्षा जास्त पात्र अर्ज प्राप्त झाल्यास** खालीलप्रमाणे प्रक्रिया राबवून गुणांकन करण्यात येईल.

समितीव्दारे खालीलप्रमाणे गुणांकनाची व मुलाखतीची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. तसेच सदर समितीचा निर्णय अंतिम असेल.

निकष	गुण	मूल्यांकनाचे निकष
शैक्षणिक पात्रता	१०	किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण; पदवी, पदविका किंवा व्यावसायिक पात्रतेस अतिरिक्त गुण (किमान शैक्षणिक अहर्ता असल्यास ५ गुण, पदवी असल्यास २ अतिरिक्त गुण, पदव्युत्तर असल्यास ५ अतिरिक्त गुण)
संगणक व डिजिटल साक्षरता	१५	MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र, संगणक हाताळणी, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, सायबर सुरक्षा यांचे ज्ञान
पायाभूत सुविधा	१५	स्वतंत्र कार्यालय, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरण, इंटरनेट, वीज बॅकअप, सीसीटीव्ही, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ प्रवेश

आर्थिक क्षमता	१०	आवश्यक गुंतवणूक करण्याची व किमान ६ ते १२ महिने व्यवसाय चालविण्याची आर्थिक क्षमता
ग्राहक सेवा व संवाद कौशल्य (मुलाखतीव्दारे)	२०	संवाद कौशल्य, तक्रार निवारण क्षमता, प्रामाणिकपणा व नागरिकाभिमुख दृष्टिकोन
अनुभव	१०	सीएससी, महा-ई-सेवा केंद्र, बँकिंग प्रतिनिधी, ई-गव्हर्नन्स किंवा तत्सम क्षेत्रातील अनुभव
व्यवसाय आराखडा व शाश्वता	५	सेवा विस्तार, जनजागृती, आर्थिक व्यवहार्यता आणि व्यवसाय नियोजन
सामाजिक समावेशकता	५	शासनाच्या धोरणानुसार दिव्यांग, माजी सैनिक, महिला, स्वयंसहाय्यता गट सदस्य किंवा स्थानिक उद्योजकांना प्राधान्य
चारित्र्य पडताळणी	१०	पोलीस पडताळणी, फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार किंवा शासकीय काळ्या यादीत नसणे

मुलाखत समिती मार्फत वरीलप्रमाणे मुलाखतीची व गुणांकनाची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. तसेच समितीचा **निर्णय अंतिम असेल.**

ठाणे जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रांच्या जाहिरातीबाबत सर्व माहिती वेळोवेळी जिल्हयाचे संकेतस्थळ https://thane.nic.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल.

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

(डॉ.संदिप माने)
निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे

क्र.सामान्य/कक्ष-४/सेतू/कावि ०८/२०२६
दिनांक -१८/ ०८ /२०२६
ठिकाण – ठाणे

परिशिष्ट – अ

ठाणे जिल्हयातील ग्रामपंचायतनिहाय आपले सरकार सेवा केंद्राची आवश्यकता असलेल्या तालुकानिहाय ग्रामपंचायतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

अ.क्र.	तालुका	ग्रामपंचायतचे नाव	रिक्त
१	अंबरनाथ	आबेशिव	१
२	अंबरनाथ	बुर्दुल	१
३	अंबरनाथ	डोणे	१
४	अंबरनाथ	नेवाळी	१
५	अंबरनाथ	पोसरी	१
६	अंबरनाथ	उसाटणे	१
७	अंबरनाथ	वांगणी (CT)	२
८	अंबरनाथ	वसार (N.V.)	१
९	अंबरनाथ	अस्नोली	१
१०	अंबरनाथ	भाल (N.V.)	१
११	अंबरनाथ	उंब्रोली (N.V.)	१
१२	अंबरनाथ	आडीवली ढोकली (N.V.)	१
१३	अंबरनाथ	काकोले	२
१४	अंबरनाथ	कासगांव	१
१५	अंबरनाथ	चिंचपाडा (N.V.)	४
१६	अंबरनाथ	आसळे (N.V.)	६
१७	अंबरनाथ	मांगरूळ	१
१८	भिवंडी	आलिमघर	१
१९	भिवंडी	भरोडी	१
२०	भिवंडी	भिनार	१
२१	भिवंडी	बोरीवली तर्फे राहूर (CT)	२
२२	भिवंडी	ब्राम्हणगांव	१
२३	भिवंडी	चिंबीपाडाा (N.V.)	१
२४	भिवंडी	दापोडे	१
२५	भिवंडी	दिवे	१
२६	भिवंडी	दिवे-अंजूर	१
२७	भिवंडी	ढोले	१
२८	भिवंडी	गाणे-फिरंगपाडा	१
२९	भिवंडी	गणेशपुरी	३
३०	भिवंडी	जू-नंदुरखी	३
३१	भिवंडी	काल्हेर (CT)	५
३२	भिवंडी	कांबे	१
३३	भिवंडी	कासणे	१
३४	भिवंडी	कशेळी	१
३५	भिवंडी	कवाड	१
३६	भिवंडी	केल्हे	१

३७	भिवंडी	केवणी	१
३८	भिवंडी	खडकी	१
३९	भिवंडी	खलींग-बु.	१
४०	भिवंडी	खांडपे	१
४१	भिवंडी	खांडवल	१
४२	भिवंडी	खारबांव (CT)	३
४३	भिवंडी	खोणी (CT)	११
४४	भिवंडी	कोन (CT)	८
४५	भिवंडी	कोपर	१
४६	भिवंडी	कुहे	१
४७	भिवंडी	ककसे	१
४८	भिवंडी	लामज	१
४९	भिवंडी	लाप -बु.	१
५०	भिवंडी	लोनाड	२
५१	भिवंडी	महापोली (CT)	१
५२	भिवंडी	मालोडी	१
५३	भिवंडी	मानकोली	१
५४	भिवंडी	मोहंदुळ	१
५५	भिवंडी	मोरणी	१
५६	भिवंडी	नांदीठणे	१
५७	भिवंडी	नांदकर	१
५८	भिवंडी	निंबवली	१
५९	भिवंडी	निवळी	१
६०	भिवंडी	ओवळी	१
६१	भिवंडी	पडघा (CT)	२
६२	भिवंडी	पायगांव	१
६३	भिवंडी	पालखणे	१
६४	भिवंडी	पारीवली	१
६५	भिवंडी	पाये	१
६६	भिवंडी	पिंपळघर-रांजणेली	५
६७	भिवंडी	पिंपळास	१
६८	भिवंडी	पिसे	१
६९	भिवंडी	पुंडास	१
७०	भिवंडी	पुर्णे (CT)	२
७१	भिवंडी	राहनाळ (CT)	४
७२	भिवंडी	राहूर	१
७३	भिवंडी	सरावली	३
७४	भिवंडी	शेलार	१
७५	भिवंडी	सोनाळे	१
७६	भिवंडी	सुपेगांव	१
७७	भिवंडी	सुरई-सारंग	१
७८	भिवंडी	तळवली	१

७९	भिवंडी	वाडघर	१
८०	भिवंडी	वाडीवली- राहूर	१
८१	भिवंडी	वाल	१
८२	भिवंडी	वेहेळे	१
८३	भिवंडी	कांबे(CT)	१
८४	भिवंडी	शेलार (CT)	५
८५	कल्याण	बापसई	१
८६	कल्याण	चवरे	१
८७	कल्याण	गेरसे	१
८८	कल्याण	गोटसई	१
८९	कल्याण	कोलम	१
९०	कल्याण	कुंदे	१
९१	कल्याण	मांजरली	१
९२	कल्याण	म्हस्कल	१
९३	कल्याण	निंबवली	१
९४	कल्याण	पोय	१
९५	कल्याण	रायते	१
९६	कल्याण	राये	१
९७	कल्याण	रूंदे	१
९८	कल्याण	सांगोडे	१
९९	कल्याण	उटणे	१
१००	कल्याण	वाहोली	१
१०१	कल्याण	वरप	२
१०२	कल्याण	काटई (N.V.)	१
१०३	कल्याण	दावडी (N.V.)	३
१०४	कल्याण	घारीवली(N.V.)	१
१०५	कल्याण	घेसर (N.V.)	२
१०६	कल्याण	हेदुटणे (N.V.)	१
१०७	कल्याण	माणगांव (N.V.)	३
१०८	कल्याण	संदप(N.V.)	२
१०९	कल्याण	उसारघर (N.V.)	२
११०	कल्याण	भोपर (N.V.)	३
१११	कल्याण	नदिवली तर्फे अंबरनाथ (N.V.)	३
११२	कल्याण	कोले (N.V.)	४
११३	कल्याण	सागांव (N.V.)	६
११४	कल्याण	निळजे (N.V.)	८
११५	कल्याण	सोनारपाडा (N.V.)	६
११६	कल्याण	आसदे (N.V.)	१०
११७	कल्याण	गोळवली (N.V.)	१०
११८	कल्याण	म्हारळ ब्रु. (CT)	८
११९	कल्याण	पिसवली (N.V.)	११

१२०	कल्याण	नदिवली तर्फे पांचनंद (N.V.)	१३
१२१	मुरबाड	आंबेगाव	१
१२२	मुरबाड	आसोसे	१
१२३	मुरबाड	बांधिवली	१
१२४	मुरबाड	भालूक	१
१२५	मुरबाड	बोरगाव	१
१२६	मुरबाड	ब्राह्मणगाव	१
१२७	मुरबाड	बुरसुंगे	१
१२८	मुरबाड	चाफे	१
१२९	मुरबाड	चासोले	१
१३०	मुरबाड	चिखले	१
१३१	मुरबाड	देहारी	१
१३२	मुरबाड	देहनोली	१
१३३	मुरबाड	देवपे	१
१३४	मुरबाड	डोंगरेन्हावे	१
१३५	मुरबाड	एकलहरे	१
१३६	मुरबाड	फांगलोशी	१
१३७	मुरबाड	फांगुळगव्हाण	१
१३८	मुरबाड	फणसवली	१
१३९	मुरबाड	गावळी	१
१४०	मुरबाड	इंदे	१
१४१	मुरबाड	जडई	१
१४२	मुरबाड	जांभूर्डे	१
१४३	मुरबाड	कान्हारले	१
१४४	मुरबाड	कासगाव	१
१४५	मुरबाड	केदुर्ली	१
१४६	मुरबाड	खांडपे	१
१४७	मुरबाड	खांदारे	१
१४८	मुरबाड	खानीवरे	१
१४९	मुरबाड	खाटेघर	१
१५०	मुरबाड	खेडाळे	१
१५१	मुरबाड	खेरेवारे	१
१५२	मुरबाड	कोलोशी	१
१५३	मुरबाड	कोलथान	१
१५४	मुरबाड	कोंडेसाखरे	१
१५५	मुरबाड	कोरावळे	१
१५६	मुरबाड	कुडावली	१
१५७	मुरबाड	माढ	१
१५८	मुरबाड	माजगाव	१
१५९	मुरबाड	माळ	१
१६०	मुरबाड	माळहेड	१

१६१	मुरबाड	मानिवली	१
१६२	मुरबाड	मानिवली	१
१६३	मुरबाड	मानिवली	१
१६४	मुरबाड	मसाले	१
१६५	मुरबाड	मेरडी	१
१६६	मुरबाड	म्हाडस	१
१६७	मुरबाड	मिल्हे	१
१६८	मुरबाड	मोहप	१
१६९	मुरबाड	नरिवली	१
१७०	मुरबाड	न्हावे	१
१७१	मुरबाड	न्याहाडी	१
१७२	मुरबाड	पार्हे	१
१७३	मुरबाड	पाटगाव	१
१७४	मुरबाड	पावळे	१
१७५	मुरबाड	पेंढारी	१
१७६	मुरबाड	पोतगाव	१
१७७	मुरबाड	रामपूर	१
१७८	मुरबाड	साखरे	१
१७९	मुरबाड	साकुर्ली	१
१८०	मुरबाड	संगम	१
१८१	मुरबाड	सासणे	१
१८२	मुरबाड	सयाले	१
१८३	मुरबाड	शेलारी	१
१८४	मुरबाड	शिरगाव	१
१८५	मुरबाड	शिरवली	१
१८६	मुरबाड	सोंगाव	१
१८७	मुरबाड	टेंभरे	१
१८८	मुरबाड	तोंडली	१
१८९	मुरबाड	उचळे	१
१९०	मुरबाड	उंब्रोली	१
१९१	मुरबाड	वैशाखरे	१
१९२	मुरबाड	वेळूक	१
१९३	मुरबाड	वडवली	१
१९४	मुरबाड	वाघिवली	१
१९५	मुरबाड	वांजळे	१
१९६	मुरबाड	शास्त्रीनगर	१
१९७	शहापूर	जनप	१
१९८	शहापूर	आपटे	१
१९९	शहापूर	आसनगाव (CT)	२
२००	शहापूर	आवरे	१
२०१	शहापूर	बाभळे	१
२०२	शहापूर	बोरशेटी	१

२०३	शहापूर	चारीव	१
२०४	शहापूर	चिखलगाव	१
२०५	शहापूर	दहागाव	१
२०६	शहापूर	धामणी	१
२०७	शहापूर	हिव	१
२०८	शहापूर	जांभुळवाड	१
२०९	शहापूर	कळमगाव	१
२१०	शहापूर	काळभोंडे	१
२११	शहापूर	कानडी	१
२१२	शहापूर	कसारा खुर्द	१
२१३	शहापूर	खर्डी (CT)	१
२१४	शहापूर	खारिवली (सो.)	१
२१५	शहापूर	कोठाळे	१
२१६	शहापूर	कोठारे	१
२१७	शहापूर	लाहे	१
२१८	शहापूर	लावळे	१
२१९	शहापूर	लेनाड बु	१
२२०	शहापूर	माढ	१
२२१	शहापूर	माळ	१
२२२	शहापूर	माणेखिंड	१
२२३	शहापूर	मांजरे	१
२२४	शहापूर	मसवणे	१
२२५	शहापूर	मोहिली	१
२२६	शहापूर	पाषाणे	१
२२७	शहापूर	साने	१
२२८	शहापूर	सारंगपुरी	१
२२९	शहापूर	सरमाळ	१
२३०	शहापूर	साठगाव	१
२३१	शहापूर	सावरोली (सो.)	१
२३२	शहापूर	शेलावली खु.	१
२३३	शहापूर	शिरोळ	१
२३४	शहापूर	शिरवंजे	१
२३५	शहापूर	तळवाडा	१
२३६	शहापूर	टेंभरे	१
२३७	शहापूर	उंबरखंड	१
२३८	शहापूर	वाशाळे बु.	१
२३९	शहापूर	वेहाळोंडे	१
२४०	शहापूर	विहिगाव	१
२४१	शहापूर	कसारा बुद्रुक (CT)	३
२४२	ठाणे	नागाव	१
२४३	ठाणे	नारीवली	१
२४४	ठाणे	पिंपरी	१

२४५	ठाणे	वाकलन	१
एकुण			**३८१**

ग्रामीण भागातील आपले सरकार सेवा केंद्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	**तालुका**	**रिक्त**
१	अंबरनाथ	२७
२	कल्याण	११५
३	ठाणे	४
४	भिवंडी	१११
५	मुरबाड	७६
६	शहापूर	४८
एकुण		**३८१**

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

(डॉ.संदिप माने)
निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे

आपले सरकार

Digital India
Power To Empower

स्वयंघोषणापत्र

मी ---

श्री/श्रीमती ---

यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय ---------- वर्ष, आधार क्र.---

राहणार ---

शहर/गांव ------------------- तालुका -------------------- जिल्हा ------------ येथील रहिवासी असून,

जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील https://thane.nic.in या संकेतस्थळावर नव्याने "आपले सरकार सेवा केंद्र" प्रसिद्ध केलेल्या रिक्त केंद्राच्या जाहिरातीच्या यादीस अधीन राहून / दिनांक / 08 / 2026 अन्वये आपले सरकार सेवा केंद्र रिक्त असलेल्या ग्रामपंचायत नावः------------------------ तालुकाः------------------ जिल्हा ठाणे पिनकोडः------------------- या क्षेत्राकरिता अर्ज करित आहे.

मी यादवारे घोषित करतो/ करते कि, वरील अर्जामधील सर्व माहिती व सर्व कागदपत्रे माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय न्याय संहिता अन्वये आणि/किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरवला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस व दंडास पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा सेतु समिती ठाणे यांचा निर्णय अंतिम राहील व तो मला मान्य राहील. याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

करिता मी आज दिनांक / / 2026 रोजी स्वतःच्या स्वाक्षरीने स्वयंघोषणापत्र सादर करीत आहे.

स्थळ:------------------------ अर्जदाराची स्वाक्षरी :- ---------------------------------------

दिनांक :- --------------------- अर्जदाराचे नांव :- ---